म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

नाटक

॥ श्री ॥

# अफझूल खानाच्या मृत्यूचा फार्स.

हें पुस्तक

छापून प्रसिद्ध करणार

गोविंद मोरोबा कार्लेकर.

आवृत्ति २ री.

"भानुप्रकाश छापखान्यांत छा०"

हें पुस्तक

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर
करून सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकानें
आपले स्वाधीन ठेविले आहेत

शके १८१२, सन १८९०

किंमत ५ आणे.

# ऐंद्र जालिक कार्ड चतुष्टय.
# ( जादूचा अद्भुत कार्डे. )

बंडल नं० १- दृश्यादृश्य इंद्रजाल. व बंडल नं० २- नानारंग रूपधार रू मायावी कार्ड. हे कार्ड पड द्याचे किंवा डबल नसतांही त्यावरील- टिपके व रंग देखतां देखत सात वेळां निरनिराळ्या प्रकारें अकस्मात बदलले जातात. या निर्जिव कार्डांपासून अशा प्रकारचे अद्भुत चम त्कार होतात. हे पाहून अति चतुर मनुष्याचीही अक्कल अगदीं गुंग होऊ न जाते त्या कार्डांमध्यें हा अद्भुत गुण नेहमीं कायम राहील. प्रत्येकानीं प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहावा. बंडल नं० ३ अजिंक्य कार्ड त्याच्या योगानें निर्धमित संख्या इतरांस पूर्ण करतां च येत च नाहींती आपण पूर्ण करूं. बंडल नं० ४ मनः कल्पित इष्टांक दर्शक कार्ड यांच्या योगानें कोणीही मनांत धरलेला अंक आपणास तात्काळ बिनचुक सांगतां येतो. वरील चार बंडलांस ह. त्यां पासून चमत्कार करून दाखविण्याच्या माहिती- च्या पुस्तकाची किंमत सध्यः फक्त एक रुपया व टपाल खं० रव० १ आणा पडेल.

वाचकहो तुह्मी अनेक गोष्टीसाठीं तुह्मी शेंकडों रुपये खर्च- केले असतील तर आतां ह्या १ रुपयाकडे न पहातां हे कार्ड घेऊन त्या च्या योगानें आप आपल्या इष्टमित्र मंडळीस नाना प्रकारचे नजरबंदी चे अति अद्भुत चमत्कार दाखवून त्याचें मनरंजन व करमणूक करा व- हा काय चमत्कार आहे त्या बद्दल त्यास अति आश्चर्य भरीत २ क- रून गुंगांत पाडा.

हे कार्ड नळावर पंचमुखी मारुतीचीगल्ली मुंबई. येथें मिळतील } गोविंद मोरोबा कार्लेकर.

॥ श्री ॥

# अफझूलखानाच्या मृत्यूचा फार्स.

## प्रवेश १ ला.

(शिवाजीच्या छावणीची जागा.)

पात्रें

गोपाळराव आणि माधवराव. असे दोघे कारकून.

प्रवेश करितात.

**गोपाळराव०**– नमस्कार माधवराव नमस्कार आज आल्या तरी भेटीचा मोठा लाभच झाला असें समजलें पाहिजे.

**माधवराव०**– कांहो गोपाळराव तुह्मी सदा सर्वदा महाराजांच्या हुजुर असतां त्यायोगानें सर्व माहिती तुह्मास असलीच पाहिजे आह्मास कांहीं वर्तमान समजत नाहीं तशांत जामदारखान्यांतील खरचाचें काम असल्यानें वरमान करावयास सुद्धां सवड नाहीं ह्मणून ह्मणतों आणखी कांहीं नाहीं हो.

**गोपा०**– एकूण आपणास दरबारी हकीगत ऐकण्याची इच्छा आहे काय सांगतों तर आतां तुह्मास काय विचारणें असेल तें विचारा.

**माध०**– (मोठ्या संतोषानें) गोपाळराव आपल्या महाराजांचें तरी धैर्य किती ह्मणून वर्णन करावें पहा त्याणें मोगलांच्या सरदारांचा नरचुराडा करून तो किल्ला हें तर तुह्मास माहितच आहे.

**गोपा०**– माधवराव आपल्या महाराजांच्या धैर्या विषयीं तर सीमाच झाली पर्वतासारखें अचळ मोठ्या तुफान घोड्यावर बसून भाला घेऊन

खेळणें तशीच महा अरण्यांत व्याघ्रादिकांची शिकार मारणें या कामांत तर त्यांचा हात खंडाच समजला पाहिजे. आज सुमारें चारपांच महिने झाले सदाशिव भट मुळें मुलाच्या लग्नाकरितां कांहीं द्रव्य पाहिजे म्हणून मागावयास आले होते त्यास महारानीं लागलेच ८०० रुपये देऊन रवानगी केली. औदार्य तर याप्रमाणेंच आहे अहो जे थोर ते थोरच दयातर जी ति पुष्पासमान कोमल आहे तेजस्वीपणा तर या भूमंडळांत प्रकाशमान सूर्यनारायणासारखाच विराजमान.

माध० - आपल्या महाराजांची शांती तरी किती म्हणून वर्णव करावी. ज साकायसागरच शस्त्रधारण करणाऱ्यांत केवळ मोंगलांचे सरदार तारीफ करतात. गाई ब्राह्मणाविषयीं फारच सदयता

गोपा० - माधवराव, आणखी माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, कोठें येणेंजाणें किंवा स्वारीची चपलता आणि प्रसंगीं कोठें गुप्त व प्रगट होणें याबद्दल जी आख्या आहे ती मी किती म्हणून सांगूं.

माध० - गोपाळराव काय चमत्कार सांगावा. मोंगलांकडील फौज आली कीं तात्काळ त्यास यमसदनीं पाठविलेंच अशा कामीं विलंब म्हणून ठाऊकच नाहीं.

गोपा० - एकून मावळे लोकांची तर कमालच झाली असें ऐकण्यांत आहे.

माध० - कमाल म्हणून काय विचारितां मोगलांकडून स्वार सिबंदी आली कीं त्यांणीं फडशा पाडलाच ते लोक फार कडवे आहेत

गोपा० - माधवराव. मला महाराजांचें दर्शन होऊन फार दिवस जाहाले करितां आपले समागमें स्वारींत येणेंची इच्छा आहे.

माध० - (फार उत्तम चलावें आपला समागम सुखास्पद मी मानीन.) असें म्हणून उभयतां निघून जातात.

## प्रवेश २ रा. पात्रें.

पादशाहा, शिरस्तेदार, फौजदार, सरदार अफझुलखान भालदार.



(बादशाहा तक्तावर बसला असतां पडदा उघडतो. )

भाल० — दिल्लीपत बादशाहा दौलत जादा मेहेरबान सलाम आप आपने जगेपर आद बसे बैठना.

( सर्व येऊन मुजरा करतात. )

बाद० — क्यों बिरबल. आपनी रियासतमों. शिवाजी भोंसला इस नामसें कोई फाकदी उठाहे उन्ने आपनें मुलुखकी बोहोत खराबी और नुकसान कियाहे. उसीका बंदोबस्त करना मुनासिब है.

बिर० — ( हातजोडून ) गरिबनवाज. आपने तरफसे बडे बडे आमीर उमराव उसीके बंदोबस्त खातर जाते रहेलेकिन कोई समे उसके साथ सामना होकर जश मिलाया नहीं. मिस्कीन माफिक भगते हे वास्ते मेरा इरादा येहि हे के कोई सरदार के साथ जंगी फौज देकर रवाना करना चाहिये.

बा० वि० — तुमने जो कहा सो सच्चा है. लेकिन आपने फौजकी तयारीके लिये निगावानी करना चाहिये.

बि० — खुदावंत. आपका हुकूम मुनासब है.

बा० — फौजदार आपने फौजकी तयारी किसतरेसे रखिहे सो बयान करो.

फौज० — (मुजरा करून) गरिबनवाज आपने फौजमें घोडे सवार

आरब, सीक मिलकेतीस हजार फौज हथियार बंद सामने की रहादे रवते हैं और पांच हजार रजपूत मेरे आरदलेमे परटके काम करनेवाले ओंही जिसवख्त हुकूम होवेगा सोही वख्त दुश्मन केसिस काटके तसरिफ करनेके इरादे में हैं इसी मुजब फौजकी तयारी हैं

बाद०-फौजदार बहोत अच्छा तयारी है लेकिन ये फौज कोई सरदार के ताबे करना हक्क है-

बिर०-खुदायवंत हुजूरकी फर्मोष होना चाहिये के समसेर बाहादूर अफझूलखानकी बुलायके दुष्मन के सामनेपर भेजवा देना और उसीकोफौजकी सरदारी मुकरार करदेना.

बाद०-( स्मरण जालें सें करून ) बिरबल बहोत अच्छा याद किया कोन हैरे आफझूल खानको बुला लाव

भाल०- जी हुकुम रवाविंदका ( निघून जातो

भाल०-दिल्लीपद बादशाहा दौलत जादा मेहेरबान आफझुल खानक खुरनिसपर निगा रखो

आफ०-( बंदगी आदाब ) इस बंदेको क्या फरमाष होती है मैं येसमशेर के जोरसें और हुजूरकेतु फलसे कोई दुष्मनकु मानता नहीं हुं

बाद०-खान साब आपने रिया ज्ञतमो शिवाजी भोंसला इस नामसें कोई दुष्मन उठाहैं औरउन्हे आपना बहोत नुकसान कियाहैं वास्ते उसीके साथ सामना करके अबादी करने खातर आपके बुलाया है

आफ०- जी होकम मेतो शिवाजीको चुव्वे माफिक जानताहूं सबबके ओ मेरे साथ सामनेमें ठेरेगा नहीं वास्ते अरज करताहूं के येहीन रव्त आगे हाजर करताहूं उस लिये आपके दिलमो फिकर नहि रहेना ( वर पाहून या मालक तेरी कुदरत अजब्ब है , असें म्हणून हुजुरास ), इसरिया सतमो समसेर बहादूरके रहेसे आफत गुजरनाबी आनेकी बात हैं वास्ते आरज करताहूं केमेरे साथ दारुगोळासा हथियारबंद फौजकी मुकरारी होना चाहिये

मेरी तयारी है.

बाद०- बहोत अच्छा तुमरे साथमें फोजकी तयारी है आब तुमारे कुचकी देरी है.

अफ०- बंदाये समसेरसें तयार है जो हुकम मालिकका.

बीर०- खाविंद एसे समसेर बाहादरके साथ एक वकील मुकरार करना चाहिये. सबब के बहोत जुगतसे ओर हुशारीसे दुष्मनको काबीज करना है लेकीन जो होकम होगा उसी मुजब तयारी करदेता हूं.

बाद०- बहोत अच्छा. कौन हैरे भालदार

भाल०- (मुजरा करके) जो होकम यं बंदा ताबीदारीमो हाजीर है.

बाद०- गोपिनाथ वकीलको बुला लावो.

भाल०- जो होकम (असे बोलून) वकिलास घेऊन येतो.

गोपि०- (मुजरा करून) महाराज सेवकास काय आज्ञा ती फरमाष व्हावी तावेदारीस हाजीर आहे.

बाद०- बीरबल- वकीलका सब अहवाल बयान करो.

बीर०- बहोत अच्छा. (असें ह्मणून गोपिनाथ पंतास) पंत सरकारची आज्ञा हीच कीं आपले राज्यांत बाई सातान्या कडील शिवाजी भोसला ह्मणून आपले शहाजी सरदाराचा मुलगा बंडखोर जाहला त्याजवर आजपावेतों पुष्कळ फौज देऊन सरदार पाठविले परंतु त्याणें त्यासर्वांचा पराजय करून आपला आमल बसविला यामुळें दरबारांतून समशेर बाहादूर आपले आफझूलखान यांची त्यांवर योजना केली आहे व त्यांस युक्तीनें धरून आपणासाठीं त्यांचे बरोबर तुह्मांस मुरव्वी नेमिलें आहेत तेव्हां तुह्मी स्वारीस जाणेची सिद्धता करावी.

गोपि०- महाराजांची आज्ञा होईल तसें करण्यास मिसिद्धच आहें.

वादृ०- आफझून खान साहेब आपके साथ सवारीमें हुजुरसे गोपिनाथ पंत वकील की मुकारीहै आब मोहीम की तयारी करना.

आफ०- बहोत अच्छा गोपिनाथ पंत चलो हमारे साथ (असें- ह्मणून हुजुरास मुजरा करून जातात.

प्रवेश ३ रा.

( स्थळ- अफझूल खानाचा बंगला. )

पात्रें:- अफझूल खान, गोपिनाथपंत वकील.



( अफजूलखान आपले बंगल्यांत बसले असतां गोपिनाथ पंत प्रवेश करितो. )

गोपि०- (मुजरा करून.) कां खान साहेब काय होत आहे?

आफ०- पंडत आवो. आच्छा हुवाके तुमको दरबारसें हमारे साथमें चलनेकी फरमाष हुई आब येहि करनाहै के हर तजविजसे- दुष्मन कु पकडकर हुजूरके आगे लाना इतने- मे तुमारी ओर हमारी बढती होगी लेकिन न जानो कोनसे वख्त क्या फीषाद होगा येही बिचार अव्वल करनाचाहिये.

गोपि०- खान साहेब आपण त्याज बद्दल निकमान्न काळजी

करूंनये. आतां प्रथम असा बंदोबस्त ठेविला पाहिजे कीं, सरकारांतून आपले बरोबर फौज किती मिळेल व ती कशी हुशार आहे. याविषयीं खात्री झाली ह्मणजे बाकीचे विचार पुढें करतां येईल.

आफ०-आपने साथकी कडीकोट तयारी है इसबातका अंदेसा नहीं करना. जबओ मराठा हमारे सामने आवेगा ओही वख्त हम क्या तजवीज करेंगे सो तुम देखते रहेना. हम उसीकु छोडनेवाले नहीं.

गोपि०-खानसाहेब आपण तसेच पराक्रमी आहांत याविषयीं मला कांहीं अंदेशा आहे असें नाहीं परंतु तिकडे गुप्त हेर पाठविले आहेत कांहीं त्याचा सुमार समजला ह्मणजे त्याच्या वर चढाई करून जाण्यास ठीक पडेल मला असें वाटतें कीं बहूतकरून आपल्या हेराची आतां यावयाची वेळा झाली आहे.

आफ०-गोपिनाथपंत यहि वखत आपना जासूद आजायगा जद सब खबर मालूम होजायगी फेर उसकी तरतूद देखलेउंगा.

गोपि०- बरें आहे.

( इतक्यांत जासूद प्रवेश करितो. )

जासू०-(मुजरा करून.) महाराज, सातान्याम शिवाजी राजण्यास जाऊन त्यांनीं आपला मोर्चा किल्ले चंद्रगड ततेच जावळी गांव्यास जाऊन तेथून आपला मुक्काम रात ठ्याचा सोमण कमाविसदार यास केदेंत ठेवून आपलें ठाणें त्याणें कसविलें यवर आपल्यास फाय अधीक बंदोबस्त करावयाचा असेल तसा करावा.

आफ०- गोपिनाथपंत देखया कहता है सो सून लेना और

मराठे लेतो बहोत धूम मचाई है.

गोप॰- खानसाहेब, आतां त्याची उपेक्षा करूं नये कारण जों पर्यंत शत्रूचें प्राबल्य झालें नाहीं, तोंच त्याचा नाश करावा असी न्यायाची रीत आहे. आतां अगोदर सातार्‍यास जाऊन किल्ला घेतला पाहिजे. सर्व कांहीं आपलें कार्य साधणार आहे. जर कांहीं तां उशीर केला तर कांहींच व्हावयाचें नाहीं म्हणून म्हणतों आणखीं कांहीं नाहीं.

**अफ॰-** सुनो गोपिनाथपंत अबि जाके दुष्मनको कतल करता हूं चलो.

गोपि॰- हा मी घोड्यावर बसलों पहा.

**अफ॰-** बहुत अच्छा है. असें म्हणून दोघे निघून जातात.

## प्रवेश ४ था.

पात्रें.

शिवाजी, तानाजी, बाजी, गोपिनाथपंत, आणि अफझुलखान.



गोपि॰- खानसाहेब आपण सरकारचा हुकूम घेऊन विजापुराहून सातार्‍यास येऊन पोंहोंचलों, आतां आपण या माहुली संगमावर आपले डेरे राहुं द्यावे ऊन छावणी करून राहाण्याचें करावें म्हणजे झालें, व मी एकाकीं जाऊन शि-

शिवाजीच्या मुत्सदीस भेटून काय इंगीत आहे ती पाहातों

**अफ०**-गोपिनाथपंत बडे जुगतीसें जाके शिवाजीकी मुलाकत लेना और शिवाजी क्या कहता हैं सो सुन लेना के र क्या करना हैं सो देखेंगे.

**गोपिना०**- बहुत उत्तम आहे. आपण सांगितल्याप्रमाणें माहुलीवर छापा घातल्यास हुकूम देऊन मीं किल्यावर त्यास भेटण्याकरितां जातों.

**अफ०**- बहुत अच्छा हैं (असें म्हणून निघून जातात.)

(पडदा पडतो.)

**शिवा०**- तानाजी मालुसरा, बाजी फसलकर, येसाजी कंक, आणि दामाजी पंत असे बसले असता पडदा उघडतो.

**माल०**-दौलतजादा मेहेरबान सलाम अस्ते निगा रखो महाराज.

**शिवा०**- कां दामाजी पंत आपलें घोरण बरेंच चाललें आहेना त्या मध्यें तर कांहीं कमी ज्यास्त नसेलच असो.

**ताना०**- कमी ज्यास्ती म्हणावयासारखें आहे असें नाहीं परंतु काळरोजी हेरानीं अशी बातमी आणिली आहे कीं, विजापुरचे सरकारानीं अफझुलखान नावाचे सरदारा बरोवर बरीच लढाई फौज देऊन रवाना केले आहेत व तो सरदार परवांचे दिवशीं माहुली मुक्कामीं येऊन पोंहोंचला, याप्रमाणें हे सांगतात तर या कामाची पुढें कोण कोण त्या प्रकारची व्यवस्था करावयाची आहे त्याविषयीं जसी सरकारची आज्ञा होईल त्या प्रमाणें करण्यांत येईल.

**शि०**- कांहो दामाजीपंत त्या मुसलमानानें अशी मसलवीज केली आहे काय तरीं आपल्याला हीपण त्याचा पराभव करण्याकरितां कांहींतरी तजवीज केलीच पाहिजे. खरें किंवा नाहीं कहो गोपिनाथपंत बोलत का नाहीं (आपल्या सरदार मंडळीर

डे पाहून )कां नानाजी बुवा करें काय शत्रु तमची भेट घ्यावयास आलें आहेत तर आपल्याकडील सर्व सिद्धता आहेना-आपले हेटकरी मावळे लोक आणि भांडारी आहेत- त्यास वसिर नीट- व्यवस्थेशीर सांगून ठेवावें-सर्व सामान सुमान नीट व्यवस्थे- शीर ठेवावें- ह्मणजे झालें-

नाना०- सरकार त्या नोडग्याची काय विसाद आहे एका ह्म पाल्या सरसी चुराडा करून यें बगताकाय? कांयेसाजी पंत आपले ह्मणणे काय हाय- इजापुराहून आफझूलखान मून एक सरदार आलाया आन पगा त्यो त्या माहुलीवर छावणी करून दोन चार दिवस झाले- मून दामाजी पंत वी ह्मणत्यात समजलें कींनाहीं-

येसा०- आमचे मावळे एकदां खवळले कीं त्या मुसलमानाची खालशी झालीच पगा-

बा०- कायराव ह्मणता हानो उगाआलाकीं त्यासीं बदडतोमंग असं ह्मणणार नाहीं कीं असें तसें माझ्या पपाचसेरा मोसी को- णी विचार साहास हाय गोफन धुंडे सोडथी भडाभड मारून त्येचा परान घेईन कधींबी सोडणार नाहीं इचारता काय आ- नपुसनाकाय-

शिवा०- कां दामाजी पंत आपल्या मंडळीची कडीकोट तयारी आहे आता शत्रू जरी आला तरी त्याचा समाचार घेण्यास कांहीं हरकत नाहीं कां नानाजी मीं ह्मणतों हें खरें आहेना-

नाना०- सरकार आपण जें ह्मणतां तें समदेंच खरें- आहे त्यांत दों रेसभर कमताई नाहीं (इतक्यांत गोपिनाथ पंत शिवाजी- ची भेट करण्या करितां येतो असें पाहून- )

माल०- दोलत जादा मेहेरबान सलाम परसिंगा रखो-

शिवा०- मालदार काय आहे रे-

आपणास हिंदु धर्माचा अभिमान असेल तर या दुष्ट यवना-
ची नोकरी सोडून आमच्या मताप्रमाणें वागावें.

**भा०** गोपिना० - कांहो दामाजीपंत तुम्ही म्हणतां ते सर्व खरें
हे. अगोदर त्यांत आमचा प्रपंच साधून परमार्थाचा ला-
आलेल्या अशी कांहीं तजवीज होत असेल तर पहा नाहीं तर

**शिवा०** - पंध्या मैथुन या प्रमाणें नव्हावें.

ऊन सन नी० - अहो पंत तुम्ही त्याविषयीं कांहीं काळजी-

**दामा०** - ( हे पहिल्यानेच सरकाराने सांगितलें की तुम्हांस ही
ऊन येतो. सनद करून देतों मग काय मात्र तुम्ही मुसलमा-

**गोपि०** - ( मुजरे सोडून द्यावी.

वे सरदार असू अशी जर सरकारची मर्जी आहे तर माझ्या
हीं करूं नये. कारण आहे असें समजा.
कामगिरीवर आहेत त्यांच्या म्हणण्यास आपण कबूल झा-
जास्त बोलणें नकोच. फारच संतोषित झालों.

**शिवा०** - गोपिनाथपंत आम्ही आहे बरें सरकार आतां न-
अशी गोष्ट आमच्या हातून व्हावयाची.
ताटाखालचें मांजर ज्याप्रमाणें आपलें सरकार मागतील तर मजक-
ठेवतील त्या प्रमाणें आम्ही राहावें हाच आमचा धर्म आहे काय का-
त हो कशाला तयानि बरखेडा पाहिजे.

**गोपी०** - अहो शिवाजीराव अहो दरबारांत प्रति दिवशीं
शिवाजीने आज तोरणा किल्ला घेतला कोणी म्हणतात वाईवर स्व-
स्वारी केली कोणी म्हणतात कीं शिवाजीनें मावळे लोक पुष्कळ ठेवि
ले याप्रमाणें आपल्याबद्दलच्या कागाळ्या येतात. आणि
यासाठीं कोणी आपण मला असें बोलतों तर यामध्यें खरेखो-
टें कितपत आहे याचा विचार आपणच करावा.

**शिवा०** - कांहो गोपिनाथपंत आपण म्हणतां हें सर्व खरें प
रंतु बंडावा करणें, तोरणा किल्ला घेणें हें काम काय लहान-

डेपाहून )कं बानाजी बुवा कसें काय शत्रु तमची भेट घ्याक आ-
आले आहेत तर आपल्याकडील सर्व सिद्धता आहेना-अ गा
हेटकरी मावळे लोक आणि भांडारी आहेत- त्यासवसि ण्या
व्यवस्थेशीर सांगून ठेवावें-सर्वसामान सुमान नीटरु ग्याचें
शीर ठेवावें- ह्मणजे झालें- ; कायतर

नाना ०- सरकार त्या नोकऱ्याची काय बिसाद अ हाला यु
पल्या सरसी चुराडा करून यं बगता काय? क याची मा-
आपले ह्मणणं काय हाय- इजापुराहून आफ झूल असे भल-
सरदार आलाया आन पगा त्यो त्या माहुलीवर गोहो नाईलाहीं-
दोन चार दिवस झाले- मून बामाजीपंत वी करें परंतु असें हु-
कींनाहीं- ( त्यास योग्य आहे

येसा०- आमचे मावळे एकदां खवळ
खालसी झालीच पगा- . बळ बोलाऊन ( त्याचे कानांल)

बा०- कायराव ह्मणता मुख्या साठीं काम आरंभिलें आहे
असे ह्मणणार नुर्के रून एकवेळ गोपिनाथ पंतास सांगावा
की विचार्त तुम्हीं जर आम्हास मदत कराल तर मी तुम्हांस
येरगांवची सनद करूनदेईन तर आपण अफजुल खा-
स कांहीं तरी सांगून ओलेभें बिनशस्त्रानेंच भेटीस येण्याचें
घडेल असें करा म्हणजे आपलें कार्य झालेंच असें समज। हें का
यं आपलें सर्वां करितांच करितों आहें असें आपण पक्कें सम
जावें यांत पुण्य होणारें आहे. असें समजा कारण त्या मुसल-
मानीं राज्यांत गोब्राम्हणाच्या फारच नाश होत चालला आहे
करितां त्यांत सारासार विच्यार करूनजें करणें तें करावें-

गो०- हें ऐकून आंतली मसलत अशी आहे काय मला काय माही-
त असो महाराज जें आपण करितां तें सर्व बरोबरच आहे-

दा०- गोपिनाथपंत आतां तुम्हांस ज्यास्त बोलणें नको ज-

आपणास हिंदुधर्माचा अभिमान असेल तर या दुष्ट यवना-
ची नोकरी सोडून आमच्या मताप्रमाणें वागाल.

गोपिना॰- कां हो दामाजीपंत तुम्ही म्हणतां तें सर्व खरें
पण अगोदर त्यांत आमचा प्रपंच साधून परमार्थाचा ला-
भ घडेल अशी कांहीं तजविज होत असेल तर पहा नाहींतर
उगीच वंध्या मैथुन या प्रमाणें नव्हावें.

दामाजी॰- अहो पंत तुम्हीं त्याविषयीं कांहीं काळजी-
करूं नको पहिल्यानेच सरकारानें सांगितलें कीं तुम्हांसही
वेरगावची सनद करून देतों मग काय मात्र तुम्हीं मुसलमा-
नाची नोकरी सोडून द्यावी.

गोपिना॰- अशी जर सरकारची मर्जी आहे तर माझ्या
कडून सिद्धताच आहे असें समजा.

दामाजी॰- आमच्या म्हणण्यास आपण कबूल झा-
लां येवढ्यानेच आम्हीं फारच संतोषित झालों.

गोपिना॰- बहूत उत्तम आहे बरें सरकार आतां म-
ला आज्ञा व्हावी.

शिवाजी॰- आतां आपण आज्ञा मागतां तर मजक-
डून ही आज्ञा आहेच पण पुढें तिकडे गेल्यावर काय का-
य त्यास सांगणार.

गोपिना॰- सरकार आतां त्या अफझलखानास अ-
सें सांगतों कीं शिवाजी हा आपले प्रताप शास्त्रास्त्रें पाहू-
न त्यास फारच भय वाटतें असा बहाणा करून त्यास ए-
कलाच बिनहत्यारें आपणास भेटावयास येण्यास सांगतों
म्हणजे झालें ना त्याच्यावर तुम्हांस जें करणें असेल तें करा.

शि॰- पंतसाहेब या प्रमाणें मसलत करून या ठिकाणीं घे-
ऊन आलात कीं त्याचा आम्हीं चांगलाच समाचार घेतो.
असा समाचार घेतो कीं बादशहास जाऊन सांगण्यास
कोणी ठेवणार नाहीं.

गोपी०-हें आपलें संभाषण ऐकून मनाचें समाधानच झालें बरें तर आपल्याकडील सर्व सिद्धता करून ठेवावी. आतां मीं त्याचे कडे जाऊन असाच घाट करितो (असें ह्मणून निघून जातो.)

शिवा०-कांदामाजीपंत हें आज मोठें अरिष्टच आलें होतें पण श्रीजगदंबेच्या प्रसादानें सर्व काम तडीस जाणारें आहे. कां तानाजी बुवा बाजीराव कसें काय आह्मीं जो घाट केली आहे तो बरा आहे ना. एकवार तो आपल्या सपाट्यांत आला कीं मंचवजीची चांगलीच चांदी करतां येईल.

येसा० तानाजी बाजी आमचें बी मत असेंच आहे.

शिवा०- आतां तो अफझुलखान माझ्या भेटीस येईल तो बिनहत्यारी येणार आहे तेव्हां तुह्मी आपल्या लेंकावर हल्ला करावा हर हर महादेव असा शब्द करा ह्मणजे मीं तिकच्या संधीस आले त्या सरदारास चांगलीच भेट देईन चला जातों मीं आतां देवीच्या दर्शनास.

भाल०- कचेरी बरखास्त (असें ह्मणून सर्व निघूनजातात)

## प्रवेश ५ वा.

### ( स्थल माहुलीची छावणी. )

पात्रें

(अफझूलखान सरदार गोपिनाथपंत-

वकील रहिम शिपाई.



अफ०-(आपल्याशीं ) अब क्या करना, गोपिनाथपंत शिवाजीके तरफ मिलनेकेवास्ते गयेहैं लेकिन आवीतक आयानहीं दुष्मन् छातीपर खडाहैं उसका कुछ भरोसा रखना नहीं (उघड) बाहेर कोन हैं

रहि०-सरकार में रहीम हैं क्या होकम होताहैं

अफ०-रहिम गोपिनाथपंत उदर आयाकी नहीं उसका तलास करो·

रहि०-बहोत अच्छाहैं (असें ह्मणून बाहेर जातो आणि परतून) खाविंद पंडित तो आवीतक आया नहीं लेकिन एक हलकारा आके दरवाजेपर खडाहैं औ कहता है कि, गोपिनाथपंत शिवाजीकूं मिलकर आये हैं·

अफ०-बहोत अच्छाहैं जाके लेकर आवो·

रहि०-हां साहेब (असें ह्मणून त्यास घेऊन येतो·)

गोपि०-(वंदकी ) करून) खानसाहेब आपल्या आज्ञेप्रमाणें शिवाजीकडे जाऊन त्यास कळविलें आहे·

अफ०-अच्छा फेर क्या हुवा·

गोपि०-खाविंद शिवाजी आपणास फार भितो करितां एकटे आपण बिन हत्यार भेटण्यास यावें असें त्याचें म्हणणें आहे. म्हणून आपणास सुचवितों कीं कांपाल्या तरी दुस्तीनें धरिला पाहिजे.

अफझुल०- मेरेको शिवाजी मरगटा डरता है येबी अच्छा है अब ऐसें करेंगे (असें म्हणून त्याचे कांहीं कानांत सांगतो)

गोपिना०-खानसाहेब आतां मात्र विलंब करूं नये आपल्या फोजेची सिद्धता करून चालावेंच.

अफझुल०- बहुत अच्छा है हमतो तयार हैं.

(असें म्हणून फौजेसह निघून जातात.)

## प्रवेश ६ वा

(स्थळ जिजाबाईचा महाल)

पात्रें:

शिवाजी, जिजाबाई आणि मोगरीदासी.



**शिवाजी०**— (आपल्याशींच) अफजुलखान जरीं आलातरीं त्याचा वकील गोपिनाथपंत आपलासा करून ठेविला आहे आतां त्यासबिन इत्यारी भेटण्याचे निमित्यानें येथें आणून त्याचे पोटांत वाघनखें रोवून प्राण घेतों नीतर आपल्या प्राणाची आशाच ठेविली नाहीं कारण आपल्या धर्माची स्थापना होऊन गोब्राम्हणाचें रक्षण झालें पाहिजे (उघड) आतां अगोदर आई साहेबांचें दर्शन घेऊन नंतर मगजें काय करणें तें करावें

(असें म्हणून जिजाबाई साहेबांचे महालांत जातो)

(जिजाबाई मंचकावर बसली असतां पडदा पडतो)

**जिजाबाई०**— कोण आहे गे दासी

**मोगरी०**— (हात जोडून) जी बाई साहेब सी मोगरी हाजर

**जिजा०**— बरें कालपासून शिवाजी माझेकडे आला नाहीं अश्या कोणत्या गडबडींत आहे कोण जाणे पण जर करितां एक क्षणभर त्याला पाहिलें नाहीं तर मला चैन पडत नाहीं आतां अगोदर जाऊन तो कोठें आहे याचा शोध करून ये बरें

**मोगरी०**— जी बाई साब आतांच बघून येतें बरं (असें म्हणून निघून जाते आणि शिवाजी तिला मार्गांत भेटतो) सरकार चलाकी आई साहेब बहारथाली

**शिवाजी०**— कोण मोगरी हा पहा मीं तिकडेच यावयास निघालों तूं पुढें जाऊन आई साहेबाला मीं आलों म्हणून वरदी दे

**मो०**— लईबेस (असें म्हणून पु० जा० क० बिंद) इतक्यांत शि० मक०

**शिवाजी०**— पलंग चौकीचे पहाऱ्याला कोण आहे

**मोगरी०**— मीं मोगरी आहें सरकार

**शि०**— मोगरी अगोदर जाऊन आई साहेबांना जाऊन सांग कीं

मीं आलों आहें ह्मणून

मोग०— जी सरकार ( असें ह्मणून आंत जाऊन येते. इतक्यांत शिवाजी प्रवेश करितो.

जिजा०— ( शिवाजीस पाहून संतोषानें ) बाबा आलास रे अरे. शिवबा जो तूं मला पूर्वी एक क्षण सुद्धां विसंबत नव्हतास नि आतां दोन दोन दिवस तुझें मुखकमल सुद्धां माझे दृष्टीस पडत नाहीं.

शिवा०— ( वंदन करून ) आई साहेब कालकिनें मीं थोडासा गडबडींत असल्या कारणानें आपलें दर्शन घेण्यास चुकलों. याची माफी असावी.

जिजा०— शिवबा असें कोणचे बरें गडबडीचें काम होतें.

शिवा०— आई फारसें ह्मणावया सारखें होतें असें कांहीं नाहीं. परंतु आमच्या कडून कांहीं धुंडावा चालले ला आहे त्याचे वरून मुसलमान यांचेमनांत फार वैमनस्य लाडत चाललें आहे. त्याच प्रमाणें विजापूर सरकारचे दरबारांतून अफजूल खान सरकार फौज घेऊन आला आहे तरी त्याचे भेटीस जावयाचें या करितां मीं आई साहेबांच्या भेटीस आलें आहें. जर करितां आई साहेबांची आज्ञा झाली तर आतांच शत्रूचा समाचार घेतों बघा.

जिजा०— बरें शिवबा आपला काळ प्रतिकूळ आहे आणि तूं अशी खटपट करितोस त्या योगानें आपल्यास व तिकडे ( विजापूरास शाहाजी बादशाहाचे पदरीं असल्या कारणानें ) दुःख मनांत आणलें ह्मणजे कांहींच चैन पडत नाहीं. ( असें ह्मणून डोळ्यास पाणी आणितें. )

शिवा०— ( आईला दुःख झालें पाहून ) आई साहेब आपण कांहीं एक मनांत आणूं नये बाबा साहेबांना त्या मुसलमानां

चीं दुःख देण्याचें मनांत आणलें आहे ह्मणूनच यांचा समाचार चांगलाच घेतों: दुसरें आणखीं कांहीं नाहीं·

जिजा॰– शिवबा तूं मोठा शाहाणा आहेस मीं तुला सांगावें असें नाहीं माझ्या बोलण्या कडे लक्ष देऊन आपलें स्वहित होईल असें कर ह्मणजे झालें·

शिवा॰ – आईसाहेब आपल्या ह्मणण्या प्रमाणेंच करितों·

( असें ह्मणून जावयास निघतो·

जिजा॰– ( इतक्यांत स्मरण झालें सें करून ) अरे शिवबा, इकडे येऊन जा, तुला जें रहस्य सांगावयाचें तें तर मी सगळेंच विसरून गेलें, बाबा पहिल्यानें भवानी आईचें दर्शन घेऊन मग आपले समर्थ गुरू रामदास स्वामी यांची भेट घेऊन तसेंच तूं आपल्या महालांत जाऊन आपल्या राणीस भेट ह्मणजे झालें या कामांत मात्र विसरू नको·

( असें ह्मणून निघून जातात· )

पडदा पडतो·

## प्रवेश ७ वा·

( स्थळ सकवारबाईचा महाल·

पात्रें:–शिवाजी, सकवारबाई, ( शिवाजीची स्त्री· ) लवंगी दासी·



( सकवार बाई आपल्या माहालांत बसले असतां पडदा उघडतो )

**सकवार०**— कोण आहे गे दासी?

**लवंगी०**— ( मोठ्या घाबरेपणानें ) जी बाई साहेब मी हाय ना लवंगी.

**सकवार०**— लवंगे तुला काल सांगितलें होतें कीं हिराबागेंत जाऊन पुष्पशय्ये करितां सुगंधित नाना प्रकारचीं पुष्पें घेऊन ये म्हणून त्याचें गे काय झालें.

**लवंगी०**— आपली आज्ञा झाली परमोणेंच व्हावें लागलीच बाग माधिं जाऊन लागलीच फुलें आनलिंत आन रखमाजी खिजमतगाराजवळ दिल्याती.

**सकवार०**— लवंगे तूं पुष्पें आणून रखमाजी जवळ दिलीं पण त्याणें अद्याप पुष्पांची शय्या केली नाहीं तर त्यास लवकर घेऊन ये.

**लवंगी०**— उई येत हाय ( असें म्हणून त्यास घेऊन येते )

**रखमाजी०**— ( मुजरा करून ) सरकार ही पहा फुलांचीं कावड गड्याच्या खांद्यावर देऊन आणिली आहे जशी आज्ञा होईल त्या प्रमाणें करितों.

**सकवार०**— रखमाजी या फुलांचीं शय्या तयार करून ठेव.

**रखमाजी०**— आज्ञा सरकार ( असें म्हणून पुष्पांची शय्या करून ठेवितो. ) बहुत करून सरकारची यावयाची वेळा झाली आहे.

**सरकार०**— लवंगे तूं आतां दरवाज्यावर जाऊन बेस आणि सरकार आल्यावर लागलीच मजला वर्दी दे.

**लव०**— बाईसाहेब [illegible] ( असें म्हणून निघून जाते ) इतक्यांत [illegible]

कोण [illegible] — [illegible] दरवाज्यावर कोण आहे.

**लवंगी०**— जी सरकार, मी लवंगी होय.

शिवा॰ - आंत जाऊन मीं आलों आहें म्हणून वरदी दे.

तुबंगी॰ - बरं जी सरकार ( असें म्हणून आंत जाऊन येते )

शिवाजी॰ - ( महालांत जाऊन मंचकावर बसतो. )

सकवार॰ - ( लाजून मर्यादेनें एका बाजूस उभी राहते )

शिवाजी॰ - सरकार; आतां का असेंच उभें राहायचें आहे काय ? माझे पाय दुखतात. इकडे येऊन सेजारीं बसा म्हणजे समाधान होईल.

सकवार॰ - सरकारच्या आज्ञेबाहेर का मीं आहें; हीपहा मीं आलें मला तरी कुठे चैन पडतें ( असें म्हणून अंकावर जाऊन बसते. )

शिवाजी॰ - कां महाराज तबियत बरावर आहेना.

सकवार॰ - सरकारची पूर्ण दृष्टि या दासीवर असली म्हणजे या दासीस काय कमी आहे, पण बाई आज आपली मुद्रा अति चंचल कांबरें दिसते. मोहिमेवर का कोठें जावयाचें आहे.

शिवाजी॰ - होय सरकार, जावयाचें आहे तर मेल्याशिवाय सुटका तरी कशी होते म्हणूनच आज्ञा घ्यावयास आलों. आणखीं कांहीं नाहीं.

सकवार॰ - त्याचें नाव तर मला समजलें पाहिजे. म्हणून काळजी करितें मी आपल्या चरण सेवेंत सिद्धच आहें.

शिवाजी॰ - जर तुमची ऐकण्याची इच्छा असेल तर सांगतों आपल्याकडून कांहीं धामधूम देशांत चालली आहे म्हणून विजापुरच्या बादशाहानें अफझूलखान म्हणून एक सरदार पाठविला आहे, त्याची भेट घ्यावयाकरितां जातों आणखीं कांहीं नाहीं.

सकवार॰ - मला सरकाराच्या [illegible] करणें आहे कीं, आ-

पल्या प्रकृतीस जपून जें काम होईल तें करा ह्मणजे झालें.

शिवा०- त्याच्या विषयीं तूं कांहीं काळजी करून को.जग दंबेच्या कृपें करून सर्व संकयंतून पार पडून तुला भेटण्या करितां लवकरच येतों.

सक०- बरें आहे मीं आपणास सांगितलें आहे त्याची मात्र आठवण ठेवा.(असें ह्मणून गोविंद विडा देते.)

शिवा०-( आलिंगन देतो )आतां तूं स्वस्थ रहा (जातो.)

सक०- लवंगे मला तुळशीची पूजा करावयाची आहे तीकडे चल.

लवं०- लइथेस हाथ (निघून जातात.)

( नंतर पडदा पडतो. )

## प्रवेश ८ वा.

( स्थळ देवीन्चें मंदीर. )

पात्रें

शिवाजी व पुजारी.



( पुजारी देवीचें द्वार उघडून पूजा करीत आहे इतक्यांत शिवाजी देवीचें दर्शन घ्यावयास प्रवेश करितो. )

शिवा०— मंदिरांत कोण आहे.

पुजारीः— महाराज मी रामाप्पा आहें. आई साहेबांची पूजा करून मंगलार्तीच्या तजविजींत आहें. (आरती करूं लागतो.)

आरती देवीची.

॥ जयदेवी जयदेवी, भगवति जय अंबे ॥ आदीमाये सुभगे तारी जगदंबे ॥ धृ० ॥ तुजविण संसारीं या अज कवण ॥ तारी अज कवण ॥ श्रमित झालो माते रक्षी येऊन ॥ जयदेवी जयदेवी जय० ॥ १ ॥ महिषासुर जगतीवर मत्त बहू झाला ॥ मत्त बहू झाला ॥ सुरवर तारायातें अवनार धरिला ॥ जयदे० ॥ २ ॥ ब्रह्माविष्णूनमिती पद पंकज लेशा ॥ पद पंकज लेशा ॥ दास भरवारा म्हणे तारी भव क्लेशा ॥ जयदेवी जयदेवी भगवति जय अंबे ॥ आदी० ॥ ३ ॥ ॥

( पुष्पांजली करितां शिवाजीचे हातांत फुलें देतो. )

शिवा०—( तीं फुलें देवीस वाहून स्तवन करितो. )

॥ पद ॥

( चाल पंचतुंड नररुंड मालधर. )

॥ सुरवर नर मुनि असुर सेविती चरण कमलीं तुज जगदंबे ॥ शाम मनोहर नारायणि गे इशानी ये जगदंबे ॥ धृ० ॥ तुजविण कवणा शरण जाउं मी रक्षील लज्जा कवण जनीं ॥ ऐसें वाटतें म्हणुन दिवसनिशि भावें लागलों तव चरणीं ॥ सुर० ॥ १ ॥ यानायाती करितां श्रमलों मानसिं भ्रमलों श्रीमाते ॥ काय करूं मज चेन पडेना पाहें सदोदित स्वार्थातें ॥ सुरव० ॥ २ ॥ ब्रह्मादिक अमरेंद्रादि स्तवि ती करुणाशाली जगमाये ॥ कूर्म दृष्टिनें पालन करिंगे संसारीं मन न्च धाये ॥ ३ ॥ ॥

सखाराम ह्मणे जगज्जननि पद चिंतन करितां यश आहे॥ इह पर साधन सकल साधुनी पावे मोक्ष पद लवलाहे ॥ सुर वर नर मुनि० ॥ ४ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

( असें स्तवन करितांच देवी प्रसन्न होते. )

देवी:- बालका त्वां ज्या कार्यास आरंभ केला आहेस तें तुझें कार्य निर्विघ्नपणें तडीस जाईल. ( असें ह्मणून आपले हातांतील तरवार शिवाजीस देते. )

शिवाजी- ( आनंदानें प्रसादरूपी तरवार घेऊन ) हे जगज्जननी कालिके तुझ्या कृपें करून या बालकाचे हेतू पूर्ण होवोत हीच इच्छा आहे ( वंदन करून निघून जातो. )

पुजारी- ( देवीस महानैवेद्य समर्पण करून ) आतां आपलें सर्व काम तर झालें. फुलें, तुळशी, दुर्वा, आणावयास जावयाचें आहे तर तिकडे जावें.

( निघून जातो. )

( पडदा पडतो. )

# प्रवेश १ ला.

## ( स्थळ सज्जनगड. )

पात्रें.

( शिवाजी रामदासस्वामी. )



शिवा०- ( भवानी आईचा प्रसाद होऊन तरही तरवार मि-
ळाली आहे आतां कांहीं हरकत नाहीं· आतां तेवढी गुरुम
हाराजांची भेट झाली ह्मणजे आपलें काम फत्तेच झालें·
समजा· ( स्मरण केल्या सारखें करून ) समजलें सम
र्थ रामदास स्वामी बहूत करून सज्जनगडावरच असतील-
कारण कालच ते तिकडे गेल्याची बातमी आली होती तर गडा
वरच जावें ह्मणजे दर्शन लाभ होईल· ( गडावर जातो· )
( शिवाजी गडावर आला असतां रामदास स्वामी पर्ण
कुटिकेंतून मनाचे श्लोक ह्मणत बाहेर येतात· )

॥ श्लोक ॥

समर्थाचिया सेवका वक्र पाहे॥ असा सर्व भूमंडळीं-
कोण आहे। जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही ॥ नुपे
क्षी कदा रामदासाभिमानी ॥१॥ जयजयरघुवीरसमर्थ॥
( असा श्लोक ह्मणत समर्थ बाहेर संचार करीत आहेत इ
तक्यांत शिवाजी पुढें येऊन वंदन करितो· )

शिवा०— (वंदन करून) महाराज आपल्या कृपें करून या दासाचे सर्व हेतू परिपूर्ण होतात. परंतु सांप्रत विजापुरच्या दरबारांतून अफझुलखान ह्मणून एक सरदार माझ्यावर सैन्य देवून पाठविला आहे तो मला भेटण्यास येऊन धरून न्यावे अशा बेतांत आहे करितां महाराज या दासास त्या संकटांतून मुक्त करावें.

रामदास. श्लोक.

समर्थाचिया सेवकावक्र पाहे॥ असासर्व भूमंडळीं कोण आहे॥ जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही॥ नुपे क्षीक दौ रामदासाभिमानी॥१॥ जयजयरघुवीरसमर्थ॥

शिवबा तूं कांहीं काळजी करूं नको. या भुमंडळावर समर्थाच्या सेवकास वक्र पाहाणारा कोण आहे! सर्व संकटांतून मुक्त करणारा सिताराम समर्थ आहे. आतां तूं आपल्या कार्यास गमन कर.

शिवा०— (हात जोडून) आज्ञा महाराज (निघून जातो.)

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश १० वा.

### (स्थळ किल्याचें मैदान.)

पात्रें

शिवाजी, तानाजी मालुसरा, बाजी फसलकर, येसाजी कंक, दादाजी पंत व इतर मावळे वगैरे.



शिवा०—( संतोषानें ) कां तानाजीराव कसा काय रंग आहे आपल्या कडील मावळे, हेटकरी; भंडारी, कोळी रामोशी, या लोकांची तयारी कशी काय आहे.

ताना०—सरकार आपले हुकुमा परमान सर्व तयारी करून ठेविली आपल्या हुकुमाचीच देरी आहे. याशिवाय दुसरें कांहीं नाहीं.

[illegible]—सरकार त्या अफझुलखानाचें काय झालें तो भेटीस येणार तरी कधीं तें समजलें ह्मणजे तशी तरतूद करण्यास ठीक पडेल.

शिवा०—ठीक त्याचा असा विचार आहे कीं, गोपिनाथपंत यांचे मार्फत अफझूलखानास एकांतीं बोलावून कांहीं मसलत करण्याचे निमित्यानें चार गोष्टी बोलण्याचे गडबडींत त्याचे पोटांत वाघनखें खुपसून त्याचा प्राण घेतां ह्मणजे झालें कीं.

ताना०—सरकार बेस मसलत काढलिया माफरमान आपल्या कडून तयारी झाली असेलच.

[illegible]०—सरकार गोपिनाथ पंता बरोबर तो अफझुलखान आपल्या भेटीस येईल त्यावेळेस आपण असें ह्मणावें कीं सरदार तो

कांचे शस्त्राचे देखावे पाहिले म्हणजे मला कांहीं भीती वाटते-कारण आम्हीं डोंगरी लोक असल्या कारणानें तो केवळ बाऊच आहे कीं कांच या प्रमाणें होतें-याप्रमाणें बाहाणा करून आपण गुप्तरीतीनें आपल्या शस्त्रांची सिद्धता नीट व्यवस्थेशीर ठेवावी-असें केल्यानें आपला कार्यभाग लवकरच होणारा आहे. यांत कांहीं संशय नाहीं.

शिवा०—दिवाणजी तुमच्या म्हणण्याप्रमाणेंच सर्व तजवीज केली आहे-त्याजविषयीं कांहीं काळजी करूं नये- आपले सरदारानींमात्र मावळे लोक जागजागीं गुप्तपणें ठेवून त्यांचे बद्दल चांगली खबरदारी ठेवावी- जर कदाचित प्रसंग पडलाच तर एकदम हल्ला करावयास बरें.

ताना०—सरकार हें काय आह्मांस निह्या गोष्टी सांगायास निनग पाहिजेच आपल्या म्हणण्याप्रमाणें समदी तयारी करून शनी ठेविलिया.

दामा०—अहो मालुसरे तो पहा आपला गुप्तहेर आला आहे तो-असें सांगतो कीं गोपिनाथ पंतास बरोबर घेऊन अफझुलखान जवळचे माळावर आला आहे- बहूत करून या ठिकाणीं यावयाची संधीच आहे.

शिवा०—ठीक आहे आतां आपण किल्याचे तटावर जाऊन पाहूंया म्हणजे तो कोणत्या थाटानें आला आहे हें समजेल.

ताना०—चलातर ( असें म्हणून सर्व निघून जातात. )

## प्रवेश ११ वा-

### (स्थळ किल्यांतील मैदानातील तंबू )

पात्रे.

शिवाजी, तानाजी, गोपिनाथपंत, दामाजीपंत, अफझुलखान.



गोपि०-(अफझुलखान) खाविंद नो पहा शिवाजी, दामोदरपंत आ-
णि तानाजी हे आपल्या समोर आले आहेत.

अफ०-क्यौं गोपिनाथपंत ये क्या शिवाजी है हमकौ देखके बहोत डर-
ता है लेकिन उसको समजा देवो.

गोपि०-खाविंद शिवाजी हा फार भित्र्या स्वभावाचा आहे करितां आपण
तंबूत शस्त्रावांचून जावें. आपल्या बरोबर मी ही येतों दुसरें कोणी नको.

अफ०-बहोत अच्छा है (असें ह्मणून भेटावयास जातो.)

शिवा०-कां गोपिनाथपंत आपल्या हुकमाप्रमाणें तयारी केली आहे
खान साहेबानां पाहून मला फार भीती वाटते.

गोपि०-शिवाजीराव आपण खानसाहेबाची भेट घेऊन जें बोलणें अ-
सलतें बोलावें.

शिवा०-गोपिनाथपंत आपण खानसाहेबांच्या भेटीचा योग आणि
लात नाहीं पेक्षां असा व्हावयाचा नाहीं.

गो०-ठीक आहे (खानसाहेबास) साहेब चला तें शिवाजी आले आहेत.

अ०-शिवाजीजवळ जावयास येतो व शिवाजी त्याजला भेटण्याच्या निमि
त्यानें येऊन त्याच्या पोटांत वाघनखें खोंविनी (उघड) दगा आहे या अल्ला
रहीम सुलतान असें ह्मणून घायाळ पडतो) व शिवाजी अफजूलखान घा
याळ पडलेला पाहून त्याचें शिर दाबानात्याचें शास्त्र सोडून घेऊन त्याचा
[illegible] नंतर पडदा पडतो.

## प्रवेश १२ वा.

( स्थळ सातान्याचा किल्ला. )

पात्रें:-शिवाजी,तानाजी, दामाजीपंत व गोपिनाथपंत.



गोपि०-सरकार आपल्या ह्मणण्याप्रमाणें खानाचा तर नाश झाला आतां आपण सुखानें नांदा.

शिवा०-गोपिनाथपंत ही सर्व जगदंबेची कृपा समजली पाहिजे.

ताना०-कसें काय दामाजीपंत आपले सरकारचा समंदें काम तडीस गेलें आतां बेस झालें ना.

शि०-दामोदरपंत आतां अगोदर या गोपिनाथपंतास हिवरेगांवची सनद करून द्या ह्मणजे झालें.

दामा०- ( आज्ञेप्रमाणें सनद लिहून आणतो. ) महाराज यावर शिक्का मोर्तब करा.

शिवा०- ठीक आहे ( असे ह्मणून त्या सनदेवर शिक्का मोर्तब करितो. गोपिनाथपंत ही घ्या सनद आतां या मराठ्याची गादी राखा ह्मणजे झालें.

गोपि० मुजरा करून ( आज्ञा सरकार असें ह्मणून खाली बसतो. )

दामा०-सर्वांस पानसुपारी देऊन सर्वांचा सन्मान करितात. )

( सर्व [illegible] आटपल्यावर सर्व जण निघून जातात. )

समाप्त.